# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक ०१.१०.२०२५ बुधवार**

**कुख्यात गुंड स्थानबध्द :—**

नागपूर शहराचे पोलीस आयुक्त यांनी दिनांक ०६.०८.२०२५ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे ईमामवाडा, अजनी, हुडकेश्वर नागपूर व पोलीस ठाणे सावनेर, जि. नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे पलाश उर्फ गन्नी उर्फ सोनु वल्द प्रकाश वासनिक वय ३१ वर्षे, रा. रामबाग, मिलींद बुध्द विहार जवळ, ईमामवाडा नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर, अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणारे, बेकायदेशिर जुगार, बेकायदेशिर लॉटरी चालविण्याचा आणि मानवी अपव्यापार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम, १९८१ अंतर्गत दिनांक ०६.०८.२०२५ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. परंतु सदरहु इसम हा फरार झाला होता. त्याचेविरूध्द जाहीरनामा काढुन सुध्दा तो स्वत: लपवुन स्थानबध्दतेच्या कारवाईपासुन पळत होता. परंतु पोलीस ठाणे इमामवाडा येथिल अधिकारी व कर्मचारी यांनी दिनांक ३०.०९.२०२५ रोजी ाोधुन गुन्हे शाखा कार्यालयात हजर केल्याने त्यास दिनांक ३०.०९.२०२५ रोजी स्थानबध्द आदेशाची बजावणी करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

पलाश उर्फ गन्नी उर्फ सोनु वल्द प्रकाश वासनिक याचेविरूध्द पोलीस ठाणे ईमामवाडा, अजनी, हुडकेश्वर नागपूर शहर व पोलीस ठाणे सावनेर, जि. नागपूर येथे खुन करण्याचा प्रयत्न करणे, जबरी चोरी, जबरी चोरी करतांना आपखुशीने गंभीर दुखापत करणे, एखादया व्यक्तीस मृत्यु किंवा गंभीर दुखापत याची भीती घालुन खंडणी मागणे, खंडणीकरिता एखादया व्यक्तीस मृत्यु किंवा गंभीर दुखापत याची भीती घालणे, स्त्रिचा विनयभंग करण्याचे उद्देशाने हमला किंवा अपराधीक बलप्रयोग करणे, दुखापत, हमला किंवा गैरनिरोध करण्याची पुर्वतयारी करून नंतर गृह—अतिक्रमण करणे, शांतता भंग करण्याचे उद्देशाने जाणिवपुर्वक अपमान करणे, आपखुशीने दुखापत करणे, प्राणघातक शस्त्राने आपखुशीने गंभीर दुखापत करणे, अपराधीक जीवे ठार मारण्याची धमकी देणे, अश्लिल भाषेत शिवीगाळी करणे, गैरनिरोध करणे, चोरी करणे, रात्रीची घरफोडी करणे, प्राणघातक शस्त्र जवळ बाळगणे, गैरकायदेशीररित्या अग्नीशस्त्र जवळ बाळगणे मनाई आदेशाचे उल्लघंन करणे इत्यादी मालमत्ता आणि शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द पोलीस ठाणे अजनी व ईमामवाडा अंतर्गत सन २०१५, २०१७ व २०२० मध्ये कलम ११० (ई)(ग) सीआरपीसी अन्वये प्रतिबंध कारवाई करण्यात आली होती. तसेच सन २०१६, २०१७ व २०१९ मध्ये एमपीडीए कायदया अंतर्गत ०१ वर्षाकरिता स्थानबध्द करण्यात आले होते. तरीही त्याचे वर्तवणुकीमध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झाली नाही. त्याने गुन्हे करणे सुरूच ठेवल्याने पोलीस ठाणे ईमामवाडा अंतर्गत सन २०२४ मध्ये १२९(ई)(ग) बीएनएसएस अन्वये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्याचे कडुन ०२ वर्षाकरिता अंतिम बंधपत्र घेण्यात आले होते. सदर बंधपत्राचे उल्लंघन करून त्याने अलीकडील काळात पोलीस ठाणे इमामवाडा नागपूर शहर व पोलीस ठाणे सावनेर, जि. नागपूर हद्दीत जबरी चोरी करतांना आपखुशीने गंभीर दुखापत करणे, एखादया व्यक्तीस

मृत्यु किंवा गंभीर दुखापत याची भीती घालुन खंडणी मागणे, खंडणीकरिता एखादया व्यक्तीस मृत्यु किंवा गंभीर दुखापत याची भीती घालणे, अपराधीक जीवे ठार मारण्याची धमकी देणे, अश्लिल भाषेत शिवीगाळी करणे, गैरनिरोध करणे, रात्रीची घरफोडी करणे, प्राणघातक शस्त्र जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे इत्यादी अशा स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे पलाश उर्फ गन्नी उर्फ सोनु वल्द प्रकाश वासनिक याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोलीस ठाणे ईमामवाडा नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस प्रस्ताव सादर केला होता. गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे समक्ष सादर केले असता, त्यांनी वर नमुद स्थानबध्द इसमाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून, त्यास धुळे जिल्हा कारागृह, धुळे येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून, त्यास सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

**(कामगिरी)**

**<u>१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, ड्रंकन ड्राईव्ह कायद्या अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—</u>**

दिनांक ३०.०९.२०२५ रोजी नागपूर शहर पोलीसांनी, सर्व पोलीस ठाणे हद्दीत **महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये ०६ केसेस, तसेच एन.डी.पी.एस कायद्यान्वये ०१ केसेस असे एकुण ०७ केसेसमध्ये ०७ ईसमावर कारवाई करून रू. १३,६३५/— चा** मुद्देमाल जप्त केला. **महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०४ केसेसमध्ये ०८ ईसमावर कारवाई करून रू. ४०,४६७/— चा** मुद्देमाल जप्त केला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकुण ५८९ वाहन चालकांवर कारवाई करून एकूण रू. २,०५,१००/— रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**<u>२) गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— चारचाकी वाहन चोरीचे ०६ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक २८.०८.२०२५ चे २०.०० वा. ते दि. २९.०८.२०२५ चे १४.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी निनाद गोपाळराव धोरडे, वय ५५ वर्षे, रा. वाल्मीकी नगर, प्लॉट नं. ९५, श्री अपार्टमेंट, अंबाझरी, नागपूर यांचे महेन्द्रा पिकअप व्हॅन क्र. एम.एच ३१ ई.एन १०५९ चा चालक नामे दिनेश पोल्हे यांनी नेहमी प्रमाणे पोलीस ठाणे अंबाझरी हद्दीत प्लॉट नं. ७६, समोर, हिलरोड, रामनगर, नागपूर येथील फिर्यादीचे ऑफीस समोर पिकअप व्हॅन ज्यामध्ये ०८ ऑक्सीजन गॅस सिलेंडर असलेले घटनास्थळी लॉक करून पार्क करून घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची पिकअप व्हॅन ऑक्सीजन सिलेंडरसह एकुण किंमती २,८०,०००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे अंबाझरी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा. न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे समांतर तपासात गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रीक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी नामे १) गयासुद्दीन वाजुद्दीन कुरैशी, वय ४१ वर्षे, रा. पलसाना, मेघा प्लाझा, सुरत, गुजरात २) ईमरान शेख ईरफान शेख, वय २८ वर्षे, रा. रोशनी खालवा, जि. खंडवा (म.प्र.) यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचे साथीदार पाहीजे आरोपी नामे ३) सद्दाम शेख, रा. बैरागड, धारणी, जि. अमरावती, ४) आझम खान, रा. मंडलाबाजार, जि. बालाघाट (म.प्र.) यांचेसोबत संगणमत करून, वरील

गुन्हयासह नागपुर शहरात एकुण ०६ चारचाकी वाहने चोरी केल्याचे सांगीतले. व त्यातील ०४ वाहने पाहीजे आरोपी यांना देवुन त्यांनी त्या वाहनांची कटींग केली असल्याचे सांगीतले. तसेच, चोरीची ०२ वाहने पाहीजे आरोपी आझम खान याला विक्री केल्याचे सांगीतले. आरोपींचे ताब्यातुन कटींग केलेल्या वाहनांचे स्पेअर पार्ट्स, ०२ इंजीन, टायर, गियरबॉक्स व ईतर पार्ट्स असा एकुण किंमती अंदाजे ४,१२,५००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. दोन आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईकामी अंबाझरी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. सुधीर बोरकुटे, पोउपनि. विवेक झिंगरे, सफौ. दिपक रिठे, पोहवा. विलास कोकाटे, शंभुसिंग किरार, सचिन बढीये, पंकज हेडाऊ, नापोअं. अजय शुक्ला, पोअं. राहुल कुसरामे, विवेक कावडकर व अभय ढोणे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे खापरखेडा :— रेती चोरी करणारे आरोपी ताब्यात, टिप्पर व जेसिबी वाहने जप्त.</u>**

दिनांक ३०.०९.२०२५ चे १३.५० वा. ते १४.४० वा. चे दरम्यान, खापरखेडा पोलीसांचे पथक पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशिर माहीतीवरून, पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत मौजा, दहेगांव रंगारी, पेट्रोल पंप चे मागे, एका टिप्पर गाडी क्र. एम.एच. ४० सि.डी. ५०८४ ला थांबवुन, पंचासमक्ष पाहणी केली असता, टिप्परमध्ये रेती असल्याचे दिसुन आले. टिप्परचालक नामे तेजनारायण गोविंदराम, वय ४५ वर्षे, रा. वलनी, तसेच त्याचे सोबत असलेला जे.सि.बी. क्र. एम. एच. ४० पि. १४४० चा चालक नामे प्रमोद पन्नालाल खैरलाल, वय ४० वर्षे, रा. शिवनगर, खापरखेडा यांना परवाना बाबत विचारपुस केली असता, त्यांनी उडवा—उडविचे उत्तरे देवुन, कोणतेही कागदपत्रे सादर केली नाही. आरोपींचे ताब्यातुन टिप्पर, जेसिबी व चार ब्रास रेती असा एकुण किंमती २०,१२,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी फिर्यादी पोअं. राजु भोयर, पोलीस ठाणे खापरखेडा यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे टिप्पर व जेसिबी चालक तसेच, गाडी मालक नामे मयसर अफसर खान, वय ३२ वर्षे, रा. वलनी, यांचेविरूध्द कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं., सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज.म.स. अधिनियम, सहकलम ४, २१ खान आणि खनिज अधिनियम, १९५७ अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना ताब्यात घेतलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे यशोधरानगर :— प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २९.०९.२०२५ चे २२.३० वा. चे सुमारास, फिर्यादी भक्तराज विश्राराम राऊत, वय ५३ वर्षे, रा. म्हाळगी नगर, गजानन मंदीर जवळ, हुडकेश्वर, नागपुर यांचा मुलगा नामे बादल राऊत, वय २९ वर्षे व त्याचा मित्र संदीप शेषराव धारपुरे, वय २९ वर्षे असे दोघे मोटरसायकल क्र. एम.एच. ४९ सि.पी. १५२१ ने पोलीस ठाणे यशोधरानगर हद्दीत चेतना किड्स शाळेसमोर रिंग रोड ने बिग मार्केट समोरून जात असता, ट्रक क्र. एम.एच. ३१ एफ.

सि. ३०७७ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाचे मोटरसायकलला धडक दिल्याने मोटारसायकल वरील दोघेही गंभीर जखमी झाले. जखमी यांना उपचाराकरीता मेया हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलास तपासुन मृत घोषीत केले. जखमी संदीप धारपुरे याचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि. सावरकर ८७८८११०७८४ यांनी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६, १२५(अ) भा.न्या.सं., सहकलम १३४, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>३) पोलीस ठाणे कळमना :— प्राणांतीक अपघात करणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ३०.०९.२०२५ चे १३.५० वा. चे सुमारास, फिर्यादी संजय यशवंत कावळे, वय ५४ वर्षे, रा. विनोबा नगर, पिएमबिएस कॉलेज जवळ, दिघोरी, उमरेड रोड, नागपुर हे त्यांचे अॅक्टीवा दुचाकी क्र. एम.एच. ४९ ए. वाय. ११२८ ने सोबत मुलगी नामे साक्षी वय १९ वर्षे हिचेसह पोलीस ठाणे कळमना हद्दीत रिवाज लॉन समोरील उड्डाण पुलावरून जात असता, आयशर ट्रक क्र. एम.एच. ४० बि.एल. ६७६४ चे चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे दुचाकीस उजव्या बाजुने धडक दिल्याने फिर्यादी हे खाली पडुन व फिर्यादीची मुलगी खाली पडुन तीचे अंगावरून ट्रक गेल्याने दोघेही गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, उपचारादरम्यान डॉक्टरांनी फिर्यादीचे मुलीस तपासुन मृत घोषीत केले. जखमी फिर्यादी यांचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि. ढोबळे ७७२१०७९७४९ यांनी ट्रक चालक आरोपीविरूध्द कलम २८१, १०६, १२५(अ) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे एम.आय.डी.सी.</u> :—** दिनांक २९.०९.२०२५ चे १९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. हद्दीत, शालीनीताई मेघे हॉस्पीटल समोर, निर्माणाधिन डोमीनोज पिज्झा ची ईमारत, हिंगणा रोड येथे फिर्यादी यांचा भाऊ नामे जाहीर शहा, मुनाफ शहा, वय ४८ वर्षे, रा. बिस्मील्ला नगर, लालखडी रोड, अमरावती, ह.मु. नागपुर हे ईलेक्ट्रीकचे काम करीत असता, त्यांना ईलेक्ट्रीक करंट लागल्याने ते बेशुध्द झाले. त्यांना लोकांनी उपचाराकरीता शालीनीताई मेघे हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी सादीक शहा मुनाफ शहा, वय ५० वर्षे, रा. बिस्मील्ला नगर, लालखडी रोड, अमरावती यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे एम.आय.डी.सी. येथे पोउपनि. महेश पवार ९८६०७५१६२३ यांनी अकस्मात मृत्युची नोंद घेतली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** जयआर्यन गणेश कामठे, वय १९ वर्षे, रा. वार्ड नं. २, पिंपळा ग्रामपंचायत जवळ, हुडकेश्वर, नागपूर हा दिनांक २७.०९.२०२५ रोजी १०.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेला. परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला नाही. **<u>वर्णन</u>**— रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, केस— काळे, उंची ५ फुट ७ इंच, अंगात— काळ्या रंगाची टि—शर्ट व काळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतो.

**<u>२) पोलीस ठाणे हुडकेश्वर</u> :—** रोहीत निलाजी मेश्राम, वय २० वर्षे, रा. प्लॉट नं. २३, शाम नगर, उमरेडकर सावजी भोजनालय मागे, हुडकेश्वर, नागपूर हा दिनांक २५.०९.२०२५ रोजी २०.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतुन राहते घरी कोणाला काहीही न सांगता निघुन गेला. परत आला नाही. त्याचा शोध घेतला असता मिळून आला

नाही. **वर्णन**— रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, केस— काळे, उंची ५ फुट ७ इंच, अंगात— हिरव्या रंगाचा—शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलतो.



जयआर्यन



रोहीत

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेस नोट — १

दरवर्षी प्रमाणे यावर्षी हि दिनांक ०२/१०/२०२५ रोजी नागपूर शहरातील **''दिक्षाभुमी''** येथे धम्मचक्र प्रवर्तनदिनाचा ६९ वा सोहळा समारोह दिक्षाभुमी नागपूर येथे संपन्न होणार असुन हया सोहळयात सहभागी होण्यासाठी फार मोठया प्रमाणावर बौद्ध भाविक रेल्वे, बस मधून तसेच खाजगी बस मेटॅडोर, जिप, कार वाहनाने व इतर वाहनांनी दिक्षाभुमीवर येतात. त्यामूळे पो.स्टे. धंतोली, गणेशपेठ, सिताबर्डी हद्दीत रस्त्यावर फार मोठया प्रमाणावर गर्दी होऊन रहदारीस अडथळा निर्माण होवून एखादे वेळी कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

यास्तव दिक्षाभुमी जवळच्या परिसरातील रस्त्यावरील वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी व सर्वसाधारण नागरिकांची गैरसोय होऊ नयें हयाकरीता खालील नमूद मार्गावर सर्व प्रकारच्या वाहन धारकांना आपली वाहने नेण्यास बंदी घालण्यात आली आहे. हया संबंधी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १) काछीपुरा चौक (कृषी महाविद्यालय वस्तीगृह) ते माता कचेरी चौका पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग | सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद |
| २) काछीपुरा चौक (कृषीमहाविद्यालय वस्तीगृह ) कल्पना बिल्डींग (रामदासपेठ) टी पॉईन्ट पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग | सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद |
| ३) माताकचेरी चौक ते कृपलानी टर्निंग, वर्धा रोड पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग | सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद |
| ४) माताकचेरी चोक ते निरी रोड "टी" पॉईन्ट पर्यतचा मार्ग | सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद (फुड झोन मधील लहान मालवाहक वाहनांना सोडुन) |
| ५) माताकचेरी चौक ते लक्ष्मीनगर चौका पर्यतचा दोन्ही बाजूचा मार्ग | सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद |
| ६) काछीपुरा चौक ते बजाजनगर चौका | सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद |

पर्यंत दोन्ही बाजूचा मार्ग **<u>( शहर बस/राज्य परिवहन विभागाची बस सेवेकरीता राखीव )</u>**

७) बजाजनगर चौक ते लक्ष्मीनगर चौक कडे जाणारा मार्ग — सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद

८) **अजनी रेल्वे पुलीया ते कृपलानी चौक** पर्यतचा उजव्या बाजूचा मार्ग दिक्षाभुमी येथे येणाऱ्या भाविकांच्या वाहनांना पार्कीग करीता वापरण्यात येणार आहे.

**वाहतूक वळविण्याचे मार्ग** -

१) लोकमत चौकाकडून काचीपूरा चौक मार्गे बजाज नगर चौकाकडे जाणारी वाहतूक ही लोकमत चौक - पंचशील चौक - झासी राणी चौक - लायब्ररी चौक- अलंकार चौक या मार्गाने जाईल. किंवा लोकमत चौक - कल्पना बिल्डींग टी पॉईंट - लायब्ररी चौक - अलंकार चौक - शंकर नगर चौक या मार्गाने जाईल.

२) वर्धा कडून कृपलानी टर्निंग, माता कचेरी चौक मार्गे जाणारी वाहतूक ही वर्धा रोड वरुन अजनी मेट्रो स्टेशन, डावे वळण घेवून आर.पी.टी.एस. मार्गे जातील. तसेच लोकमत चौकाकडून कृपलानी टर्निंग मार्गे माता कचेरी चौका मार्गे जाणारी वाहतूक वर्धा रोड वरून अजनी पूल चौक, हिन्दुस्तान कॉलोनी चौक, यु टर्न, अजनी मेट्रो स्टेशन डावे वळन घेवून आर.पी.टी.एस. मार्गे जाईल.

३) अलंकार टॉकीज चौकाकडून काचीपूरा चौक मार्गे जाणारी वाहतूक ही नॉर्थ अंबाझरी मार्गावरुन शंकरनगर चौक व युनिर्व्हसीटी लायब्ररी चौक - झासी रणी चौक या मार्गे जाईल.

४) लक्ष्मीनगर चौकाकडून माता कचेरी चौका मार्गे जाणारी वाहतूक ही आठ रस्ता चौक मार्गे जाईल.

५) निरी टी पॉईन्ट ते माता कचेरी चौक मार्गे जाणारी वाहतूक ही आर.पी.टी.एस व अजनी चौक मार्गे जाईल.

६) बजाजनगर चौकाकडून लक्ष्मीनगर चौक मार्गे जाणारी वाहतूक व्ही.एन.आय.टी. चौक, अभ्यंकरनगर मार्गे जाईल.

७) अजनी रेल्वे पुलावरुन कृपलानी चौकाकडे जाणारी वाहतुक ही उजवीकडे अजनी रेल्वे स्टेशन मार्गे किंवा डावीकडे चुनाभट्टी मार्गे पुढे जाईल.

८) दिक्षाभुमीच्या आजु-बाजुचे परिसरात राहणारे नागरीक किंवा ज्यांचे कार्यालय आहे त्यांना वाहन घेवुन जाणे आवश्यक असल्यास त्यांनी पोलीस निरीक्षक, वाहतुक परिमंडळ सोनेगाव, पो.ठाणे सोनेगाव जवळ, वर्धा रोड नागपूर शहर यांच्या कडुन पासेस प्राप्त करतील.

९) ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार कर्तव्यावरिल वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना वरील मार्ग बंद/सूरू ठेवण्याचा व योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**१०) धम्मचक्र सोहळयात दिक्षाभुमी या ठिकाणी येणाऱ्या बौद्ध भाविकांनी आपली वाहने**

**खालील ठिकाणी पार्क करावीत.**

**१)** धरमपेठ सायन्स कॉलेज, **२)** राणी लक्ष्मीबाई सभागृह लक्ष्मी नगर, **३)** तारकुंडे धरमपेठ हायस्कुल मैदान **४)** धरमपेठ कॉलेज ग्राऊंड **५)** बजाजनगर बास्केट बॉल मैदान, **६)** मॉर्डन हायस्कुल निरी **७)** लक्ष्मीनगर झोन कार्यालय **८)** कृपलानी टी पॉईंट सेंट्रल जेल बाजुस **९)** एल.ए. डी कॉलेज **१०)** नविन डी.पी रोड कृपलानी चौक ते अजनी रेल्वे पुल **११)** दंडीके एन.एम.सी ग्राऊंड

**१२)** मुकबधिर विद्यालय शंकर नगर चौक **१३)** कार्पोरेशन एन.एम.सी. ग्राऊंड इंदीरा गांधी रूग्णालय च्या मागे

**सदर अधिसुचना दिनांक ०१/१०/२०२५ चे सकाळी ०९.०० ते दिनांक ०४/१०/२०२५ चे २२.०० वाजे पर्यंत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी व सर्व नागरिकांनी या आवाहनाचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

## वाहतुक शाखेची प्रेस नोट – २

दरवर्षी प्रमाणे यावर्षी हि धम्मचक्र प्रवर्तन दिनाचा ६९ वा सोहळा दिनांक ०२/१०/२०२५ रोजी साजरा होणार असून या प्रित्यर्थ देशाच्या विविध ठिकाणाहून दिक्षाभुमी येथे येणारे भाविक मंडळी कामठी येथील प्रसिध्द ड्रॅगन पॅलेस ला भेट देत असल्याने या ठिकाणी भाविकांची लाखोंच्या संख्येने उपस्थिती राहते. त्यामूळे त्याठिकाणी एका भव्य यात्रेचे स्वरूप निर्माण होते. सदर भाविकांची गर्दी दि. ०१/१०/२०२५ ते दि. ०४/१०/२०२५ या चार दिवसाकरीता असते. ड्रॅगन पॅलेस आणि आंबेडकर सांस्कृतीक भवन या धार्मीक स्थळी उपासक-उपासीकांची (भावीकांची) ये-जा असते. त्या मार्गावर मोठ्या संख्येने भावीक असतात आणि त्याच मार्गावरून ड्रॅगन पॅलेसचे पलीकडे राहणारे कुंभारे कॉलोनी, आझाद नगर, लुंबीनी नगर, छत्रपती नगर लागुन असलेले इतर भागातील रहीवासी वाहनाने (चारचाकी व दुचाकी) गर्दीतून बळजबरीने जाण्याचा प्रयत्न करतात त्यामूळे जाणारे येणारे वाहनांन कडून उपासक-उपासीकांना (भावीकांना) अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. करिता अधिसूचना प्रसारित करण्यात आलेली आहे.

**खालील प्रमाणे सर्व वाहनांना प्रतिबंध करण्यात येणारे मार्ग:-**

पोरवाल कॉलेज रोड, वाय पॉईट, ते भोयर कॉलेज टी पॉईट या मार्गा वरील सर्व प्रकारच्या वाहतूकीला प्रतिबंध करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग :-**

कुंभारे कॉलोनी, आझाद नगर, लुम्बीनी नगर, छत्रपती नगर, संत रविदास नगर या भागातील रहवासी व मार्गावरील इतर वाहतूक ही रमानगर रेल्वे क्रॉसींगचे निर्माण कार्य पुर्ण झाल्याने सर्व वाहतूक ही रमा नगर उड्डाणपुला वरून जयस्तंभ चौकातून जे.एन. रोडने भुयारी पुलीया, जुना बोगदा जे.एन रोडने पुढे अजनी भुयारी बोगदा कडून अजनी गाव निरी पुलीया नंतर उजवे वळण हैद्राबाद हायवे,डावे वळण घेवुन जबलपूर हायवे, लिहीगाव पूलीया खालून उजवे वळण घोरपड रोड, घोरपड टी पॉईट, उजवे वळण डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, उजवे वळण घेवून छत्रपती नगर, रविदास नगर, कुंभारे कॉलोनी आझाद नगर या मार्गाचे वापर ये-जा करण्या करीता करतील. तसेच ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार व आवश्यकतेनुसार कर्तव्यावरिल वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना मार्ग बंद/सूरू ठेवण्याचा व योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**सदर अधिसुचना दिनांक ०१/१०/२०२५ चे ०९.०० ते दिनांक ०४/१०/२०२५ चे २२.०० वाजे पर्यंत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी व सर्व नागरिकांनी या आवाहनाचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

## वाहतुक शाखेची प्रेस नोट – ३

नागपूर शहरात "नवरात्र उत्सव" हा दिनांक २२/०९/२०२५ ते दिनांक ०२/१०/२०२५ पर्यंत साजरा होणार असून रोजी दुर्गा देवी मुर्तीचे विसर्जन शहरातील फुटाळा तलाव, कोराडी तलाव,येथील कृत्रीम तलावात करण्यात

येणार असल्यामूळे दुर्गा विसर्जनाचा सोहळा पाहण्यास भाविकांची गर्दी होवून वाहतूकीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. वाहतूक सुरळीत रहावी व सामान्य नागरिकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून वाहतूक नियमन करण्याचे दृष्टीने अधिसुचना निर्गमीत आहे.

**१. फुटाळा तलाव.:-**

**-: वाहतूकीचे नियोजन :-**

१) पुर्व नागपूर हद्दीतील सी.ए.रोडने फुटाळा तलाव येथे विसर्जनास येणाऱ्या दुर्गा मुर्ती ह्या रामझुला मार्गे जयस्तंभ चौक, श्रीमोहिनी कॉम्पलेक्स, एलआयसी चौक, साधु वासवानी मार्गे लिबर्टी टी पॉइंन्ट, सी.के.नायडू चौक, सदर पोलीस स्टेशन, जपानी गार्डन चौक, वेस्टर्न कोलफिल्ड कार्यालय, दुध डेअरी, तेलंगखेडी हनुमान मंदिर ते फुटाळा तलाव येथे जातील. दुर्गा देवी मुर्ती ठेवलेल्या वाहना व्यतिरीक्त इतर वाहनांना तेलंगखेडी हनुमान मंदिरापासून फुटाळा तलावाकडे प्रवेश बंद करण्यात येत असून सदरची वाहने तेलंगखेडी येथील हनुमान मंदीर समोरील मत्स्य विज्ञान महाविद्यालय जवळून शिवमंदीर कडे तसेच त्याच महाविद्यालया पासून सि. पी. क्लब कडे जाणारे दोन्ही बाजुला निश्चित केलेल्या ठिकाणी पार्क करावीत.

२) वायुसेना कमांड प्रवेश द्वार कडून फुटाळा तलाव या मार्गावरील सर्व प्रकारचे वाहतूकीवर परिस्थिती नुसार निर्बंध घालण्यात येत आहे.

३) कॉटन मार्केट मार्गे फुटाळा तलाव येथे विसर्जनास येणाऱ्या दुर्गा मुर्ती ह्या कॉटन मार्केट चौक, विजय

टॉकीज टी पॉईंट, नविन आर.ओ.बी मार्गे शनी मंदिर येथुन मानस चौक,मॉरिस टी पॉइंन्ट,व्हेरायटी चौक,

महाराजबाग चौक, भोले पेट्रोलपंप चौक, लॉ कॉलेज चौक, रविनगर चौक ते भरतनगर चौक येथून फुटाळा तलाव येथे जाईल.

४) अमरावती रोड कॅम्पस चौक ते फुटाळा तलाव कडे जाणारे मार्गावरील सर्व प्रकारचे वाहतूकीस परिस्थिती नुसार निर्बंध घालण्यात येत आहे..

५) फुटाळा वस्तीतील एकूण ०६ गल्ल्यामधून फुटाळा तलाव कडे येणारे सर्व प्रकारचे वाहतूकीवर परिस्थिती नुसार निर्बंध घालण्यात येत आहे..

७) मनिष नगर भागातुन दुर्गा देवी विसर्जना करीता येणारी मंडळे :- सोमलवाडा चौक - राजीवनगर टी पॉईन्ट - कोकाकोला चौक - स्नेहनगर चौक - छत्रपती नगर चौक डावे वळण - सावरकरनगर चौक - आठ रस्ता चौक - शंकरनगर चौक- रविनगर चौक या मार्गाने फुटाळा तलाव येथे येतील.

८) तेलंगखेडी टी पॉईंट व भरतनगर टी पॉईंट कडून दुर्गा देवी मुर्ती घेवून येणारी दुचाकी वाहने फुटाळा तलावाचे रस्त्यावरील पुर्व बाजुस असलेल्या मोकळ्या जागेत उपलब्ध असलेल्या पार्कीग मध्ये पार्क करतील व त्यांचे दुर्गा देवी मुर्तीचे विसर्जन करून लगेच वाहने घेवून निघुन जातील.

९) सहकार नगर भागातुन दुर्गा देवी मुर्ती विसर्जना करीता येणारी मंडळे :- खामला चौक-सावरकर नगर

चौक - आठ रस्ता चौक - शंकरनगर चौक - रविनगर चौक या मार्गाने फुटाळा तलाव येथे येतील

१०) छिंदवाडा रोड कडून नागपूर कडे जाणारी जड वाहतूक दहेगाव मार्गे खापरखेडा मार्गे आशा हॉस्पिटल कामठी रोड कडे जातील.

११) कामठी कडुन छिंडवाडा कडे जाणारी वाहतुक आशा हॉस्पीटल समोरून खापरखेडा, दहेगांव ते सावनेर कडे जातील.

१२) वर्धा ते नागपूर (महामार्ग क्र ४४) येणारी जड वाहने नागपूर शहरात प्रवेश बंदी करण्यात येत आहे. छिंदवाडा व अमरावती कडे जाणारी जड वाहतुक १) सावनेर कडुन आउटर रिंग रोड २) जामठा वाय पाईंट ते भंडारा राष्ट्रीय महामार्ग (जबलपुर हायवे) या मार्गाचा वापर करतील.

वरील "१" ते "९" या मार्गाने फक्त दुर्गा देवी मुर्ती घेवून येणारी हलकी वाहने फुटाळा तलावा जवळील वायूसेनानगर कडे जाणाऱ्या रोडवरील टी पॉईन्ट येथे त्यांचे कडील वाहनामधून दुर्गा देवी मुर्ती खाली उतरवुन विसर्जनाच्या ठिकाणी नेतील. रिकामी झालेले वाहने सरळ वायूसेना नगर कडून टि.व्ही. टॉवर चौक, बालोद्यान (सेमिनरी हिल) मार्गे राजभवन मागील गेट पासून आपआपल्या ठिकाणी परत जातील. जड व मोठ्या दुर्गा देवी मुर्ती सह येणारे ट्रक व तस्सम वाहने फुटाळा तलावावर येवून विसर्जन करतील.

## २. कोराडी तलाव :-

**अ)** नागपूर शहरातील दुर्गा देवी मुर्ती व घट चे विसर्जन करण्याकरीता येणारे सार्वजनिक मंडळांचे दुर्गा देवी मुर्ती हे मानकापुर, कोराडी टी पांईट, महादुला टी पांईट, भारत माता चौक (वंजारी भवन चौक), कोराडी तलाव नांदाफाटा येथे विसर्जना करीता येतील. व त्याठिकाणी मुर्ती विसर्जनकरीता उतरवुन विसर्जन करतील तसेच रिकामी वाहने त्याच मार्गाने परत जातील.

**ब)** नागपूर ग्रामीण भागातुन विसर्जना करीता येणाऱ्या दुर्गा देवी मुर्ती व घट नांदा फाटा मार्गे येवुन कोराडी तलाव येथे विसर्जनाकरीता येतील. व त्याठिकाणी मुर्ती विसर्जनाकरीता उतरवुन तलावात विसर्जन करतील तसेच रिकामी वाहने त्याच मार्गाने परत जातील.

तसेच दिनांक ०२.**१०.२०२५ रोजी सकाळी ०६.०० वा. पासून दिनांक ०४.१०.२०२४ चे २४.०० वा. पर्यत वाजेपर्यंत सदर अधिसूचना अमंलात राहील.**

वरिल प्रकारचे निर्बंध हे अत्यावशक सेवेत असलेल्या शासकीय वाहनांना लागू राहणार नाही. ही अधिसुचना लाऊड स्पीकरने किंवा पुढे दिलेल्या कोणत्याही प्रकाराने जाहीर करावी.

तरी सर्व नागरिकांना विनंती करण्यांत येते की, सुलभ वाहतुकी करिता आणि वाहतुकीस अडथळा निर्माण होऊ नये म्हणून उपरोक्त प्रमाणे काढण्यांत आलेल्या आदेषाची अंमलबजावणी करण्याकरिता सहकार्य करावे आणि आपली होणारी गैरसोय टाळावी.

## <u>वाहतुक शाखेची प्रेस नोट – ४</u>

वाहतूक परिमंडळ कॉटन मार्केट हद्दीतील रेशिमबाग मैदान येथे दिनांक ०२.१०.२०२५ रोजी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा १०० वा वर्धापन दिन कार्यक्रम होणार आहे, या निमित्याने सदर कार्यक्रमाकरीता व्हि.व्हि.आय.पी. तसेच संघाचे २५ ते ३० हजार स्वयंमसेवक कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नागपूर शहरातुन दि. ०२/१०/२०२५ रोजी सकाळी ०५:०० वा. पासुन सदर कार्यक्रमाकरीता लोक आपआपले वाहनाने येणार आहेत. त्यामूळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात लोकांची आवक-जावक करणाऱ्या वाहनामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता नमुद कार्यक्रमाचे दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवशयक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये, त्यामुळे वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

१. भंडारा रोडने जगनाडे चौकाकडुन ग्रेटनागरोडने अप्सरा चौक, बैद्यनाथ चौकाकडे येणारी वाहतूक ही जगनाळे चौकातून भांडे प्लॉट चौक छोटा ताजबाग, तुकडोजीपुतळा चौक, मेडीकल चौक मार्गे वळविण्यात यईल.
२. उमरेड रोडने सक्करदरा चौक, अशोक चौकाकडे येणारी वाहतूक सुध्दा भांडे प्लॉट चौक, छोटा ताजबाग, तुकडोजीपुतळा चौक, मेडिकल चौक मार्गे वळविण्यात येईल.

३. सरदार पटेल चौकाकडुन बैद्यनाथ चौक, अशोक चौकातून जगनाडे व उमरेड रोडने जाणारी वाहतूक बैधनाथ चौकातून मेडीकल चौक, तूकडोजीपुतळा चौक छोटा ताजबाग चौक, भांडे प्लॉट चौक व जगनाडे चौकामार्गे जातील.

**सदर अधिसुचना दिनांक ०२/१०/२०२५ रोजी चे ००:०० वा. पासुन कार्यक्रम संपेपर्यत अंमलात राहील.**

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी या अधिसुचनेचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व पोलीसांना सहकार्य करावे.

स्वा/-
( **लोहित मतानी,** भापोसे )
पोलीस उप आयुक्त,वाहतुक,
नागपूर शहर

**पोलीस उप आयुक्त, वाहतूक, नागपूर शहर यांचे कार्यालय**
सिव्हील लाईन्स, स्वागत लॉन जवळ, नागपूर शहर - 440001
दुर.क्र. (0712) 2564550 ई-मेल : dcptraffic.ngp@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/नाग/प्रेसनोट/२०२५-3871 नागपुर शहर. दिनांक.30.०९.२०२५

## प्रेस नोट

दिनांक ०२/१०/२०२५ रोजी नागपूर शहरातील "करतुरचंद पार्क" येथे सनातन धर्म सभा, कडबी चौक, नागपूर यांच्या संयोजनाखाली (रावण दहनावा) कार्यक्रम आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमाकरिता नागपूर शहरातील हजारोंच्या सख्येने नागरिक उपस्थित राहतात. त्यामूळे नागपूर शहरात कस्तुरंचद पार्क सभोवताली वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागपूर शहरातील वाहतूक सुरळीत रहावी. सामान्य नागरिकांना धोका, गैरसोय किंवा अडथळा निर्माण होवू नये म्हणून खालील प्रमाणे मार्गावरील वाहतूकीवर निर्बंध घालण्याकरिता अधिसूचना काढण्यात आलेली आहे.

दिनांक ०२/१०/२०२५ रोजी १५.०० वाजता पासून ते रात्री २२.०० वाजेपर्यंत खालील नमूद मार्गावर सायकल व सायकलरिक्षासह सर्व प्रकारच्या वाहनांच्या वाहतूकीवर बंदी घालण्यात आलेली आहे.

अ) एल.आय.सी. चौक ते संविधान चौक
ब) कन्नमवार पुतळा ते संविधान चौक
क) फॉरेस्ट ऑफिस चौक ते संविधान चौक
ड) कस्तुरचंद पुतळा चौक (श्री मोहीनी कॉम्प्लेक्स) ते संविधान चौक

**वरील मार्गावरिल वाहतुक ही खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

१) एल.आय.सी. चौकाकडुन ते संविधान चौक मार्गे जाणारी वाहतूक एल.आय.सी. चौक येथुन लिबर्टी चौक किंवा जयस्तंभ चौक अशा दोन्ही मार्गावरून वळविण्यात येत आहे.

२) कन्नमवार पुतळा चौकामार्गे संविधान चौकामार्गे जाणारी वाहतूक कन्नमवार चौक येथुन मिठनिम दर्गाह किंवा बिशॉप कॉटन स्कुल मार्गे वळविण्यात येत आहे.

३) श्री मोहिनी कॉम्पलेक्स कडून संविधान चौकामार्गे जाणारी वाहतूक श्री मोहिनी कॉम्पलेक्स येथुन सरळ एल. आय.सी. चौक मार्गे वळविण्यात येत आहे.

४) रामझुला उड्डाणपुलावरून संविधान चौकाकडे येणारी वाहतुक हि सरळ आय.सी. चौक मार्गे वळविण्यात येत आहे.

५) फॉरेस्ट ऑफीस चौक ते संविधान चौक प्रिंन्स सावजी गल्ली मार्गाने जाणारी वाहतूक फॉरेस्ट ऑफीस चौक येथुन येणारी वाहतूक झिरो माईल टी पांईट किंवा मिठानिम दर्गा मार्गे वळविण्यात येत आहे.

६) जुना काटोल नाका ते एमएसईबी वाय पॉईन्ट आणि कल्पना टॉकीज चौक ते एमएसईबी वाय पॉईन्ट पर्यंत सदर उड्डाणपूल दिनांक ०२.१०.२०२५ रोजी १५.०० वा. पासून कार्यकम संपेपर्यंत बंद करण्यात येणार आहे. या मार्गाने येणाऱ्या वाहन चालकांनी इतर पर्यायी मार्गाची वापर करावा.

७) ऐनवेळी निर्माण झालेल्या परिस्थितीनुसार व आवश्यक्तेनुसार कर्तव्यावरिल वाहतूक पोलीस अधिकाऱ्यांना वरील मार्ग बंद/सूरू ठेवण्याचा व योग्य मार्गाने वाहतूक वळविण्याचे अधिकार प्रदान करण्यात येत आहे.
सदर अधिसुचना लाऊड स्पिकरवरून किंवा पुढे दिलेल्या कोणत्याही प्रकाराने वाहतूक परिमंडळ सिताबर्डी ,सदर चे पोनि यांनी जाहीर करावी.

तरी नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी व सर्व नागरिकांनी या आवाहनाचे पालन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

( लोहित मतानी, भापोसे )
पोलीस उप आयुक्त, वाहतूक
नागपूर शहर.

प्रति,
जनसंपर्क अधिकारी, पोलीस माहीती केन्द्र, नागपूर शहर